महाराष्ट्र शासन
**महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
**२८ राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१.**
ई-मेल dy.commissionercdc@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२०-२६३३०३७४

---

जाक्र/मबाविआ/बावि/का-5/बान्यामं/निप्र/2024-2025/ १०८८ दिनांक – २५।३।२०२५

मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
जी.टी. हॉस्पीटल समोर ६ वा मजला,
नवीन मंत्रालय इमारत, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय :- महाराष्ट्र राज्यातील बाल न्याय मंडळावरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करणेबाबत.**
**(महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हे एकुण -36)**

संदर्भ :-1. शासन अधिसुचना दि. 02/05/2022 व दि.09.06.2022
2. शासन पत्र प्र.क्र.07 दिनांक 8 जानेवारी,2025
3. आयुक्तालयाचे पत्र क्र. 841 दि. 05/02/2025 रोजीचे पत्र.
4.शासन पत्र क्र.बान्यामं-2025/प्र.क्र.07/का-03दिनांक 21मार्च,2025

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५व सुधारीत अधिनियम २०२१ मधील प्रकरण ३ मधील कलम ४ (१) तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील प्रकरण २ मधील नियम ३ व ४ मध्ये बाल न्याय मंडळ गठित करण्याची तसेच मंडळाची रचना याबाबतची तरतूद आहे.

सदर तरतुदी नुसार बाल न्याय मंडळ, सदस्य या पदासाठी शासन अधिसूचना दिनांक 2 में, 2022 व अधिसूचना 9 जून, 2022 अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या सदस्यांची नियुक्ती लवकरच संपुष्टात येणार असल्याने संदर्भक्र.4 चे शासन पत्रान्वये जाहिरात प्रसिध्द करणेबाबत कळविलेले आहे

त्यानुसार बाल न्याय मंडळ अशासकीय सदस्य पदांसाठी विहीत पात्रतेचे निकष पुर्ण करणा-या उमेदवारांकडुन नामांकने प्राप्त करुन घेणे बाबतची जाहिरात यापत्रासोबत जोडण्यात येत आहे

आपणास विनंती करण्यात येते की,सदरहु जाहिरात नमुद जिल्यातील सर्वाधिक खपाचे दोन वर्तमानपत्रातून मराठी प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| 1 | **कार्यालयाचे नाव** | महिला व बाल विकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग, जुन्या सर्कट हाऊस जवळ, पुणे-१. |
| 2 | **जाहिरात प्रसिध्द करण्याचा दिनांक** | 28/03/2024 |
| 3 | **बील कोणाकडे पाठवावे** | महिला व बाल विकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग, जुन्या सर्कट हाऊस जवळ, पुणे-१. |
| 4 | **जाहिरातीचे स्वरुप** | **महाराष्ट्र राज्यातील बाल न्याय मंडळावरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करणेबाबत.** |
| 5 | **क्षेत्र** | महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हे एकुण -36 |
| 6 | **किती वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्द करण्यात यावी** | जिल्हा स्तरावरील एका अग्रगण्य वृत्तपत्रात. |
| 7 | **जाहिरात कितीवेळा प्रसिध्द करावयाची आहे** | एकवेळा |
| 8 | **नामांकन सादर करावयाचे ठिकाण** | संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी |

**सोबत :- जाहिरातीचा मसुदा**

**आपली विश्वासु,**

**नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य**

प्रत – मा. सचिव महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय , मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

**जाहिरात**

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५व सुधारीत अधिनियम २०२१ मधील प्रकरण ३ मधील कलम ४ (१) तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील प्रकरण २ मधील नियम ३ व ४ अन्वये बाल न्याय मंडळ गठित करण्याची तसेच मंडळाची रचना याबाबतची तरतूद आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम ९१ च्या अधिन राहून महाराष्ट्र राज्यातील बाल न्याय मंडळ, गडचिरोली व नागपूर येथील प्रत्येकी १-१ अशासकीय सदस्य व बाल न्याय मंडळ, पुणे (अतिरिक्त) येथील 2 अशासकीय सदस्य असे एकुण 4 पदे वगळून उर्वरित सर्व बाल न्याय मंडळाची जिल्हयातील दोन अशासकीय सदस्य पदाकरिता पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

वर नमुद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटीची पुर्तता करणा-या इच्छुक व्यक्तींनी विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम आवश्यक कागदपत्रांसह १५ दिवसांच्या आत आपले जिल्हयातील संबंधित जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयात सादर करावेत. तसेच सदरची सविस्तर जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in व आयुक्तालयाच्या http://wcdcommpune.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य

## जाहिरात
## महाराष्ट्र शासन
## महिला व बाल विकास विभाग

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५व सुधारीत अधिनियम २०२१ मधील प्रकरण ३ मधील कलम ४ (१) तसेच राष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील प्रकरण २ मधील नियम ३ व ४ मध्ये व अधिसूचना दि.२८.१२.२०२० महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०२० बाल न्याय मंडळ गठित करण्याची तसेच मंडळाची रचना याबाबतची तरतूद आहे. महाराष्ट्र राज्य बाल न्याय( मुलांची काळजी संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम ९१ च्या अधिन राहून खालील नमुद जिल्हयामधील बाल न्याय मंडळ सदस्य या रिक्त पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

**बाल न्याय मंडळ जिल्हा निहाय रिक्त पदे**

| | | |
|---|---|---|
| 1 | मुंबई शहर | 2 |
| 2 | मुंबईउपनगर | 2 |
| 3 | ठाणे | 2 |
| 4 | पालघर | 2 |
| 5 | रायगड | 2 |
| 6 | रत्नागिरी | 2 |
| 7 | सिंधूदुर्ग | 2 |
| 8 | पुणे -1 | 2 |
| 9 | सातारा | 2 |
| 10 | सांगली | 2 |
| 11 | सोलापूर | 2 |
| 12 | कोल्हापूर | 2 |
| 13 | नाशिक | 2 |
| 14 | नंदुरबार | 2 |
| 15 | जळगांव | 2 |
| 16 | धुळे | 2 |
| 17 | अहमदनगर | 2 |
| 18 | भंडारा | 2 |
| 19 | चंद्रपूर | 2 |
| 20 | गडचिरोली | 1 |
| 21 | गोंदिया | 2 |
| 22 | नागपूर | 1 |
| 23 | वर्धा | 2 |
| 24 | अकोल | 2 |
| 25 | अमरावती | 2 |
| 26 | बुलडाणा | 2 |
| 27 | यवतमाळ | 2 |
| 28 | वाशिम | 2 |
| *29* | छ. संभाजीनगर | 2 |
| *30* | बीड | 2 |
| 31 | हिंगोली | 2 |
| 32 | जालना | 2 |

| | | |
|---|---|---|
| 33 | लातुर | 2 |
| 34 | नांदेड | 2 |
| 35 | धाराशिव | 2 |
| 36 | परभणी | 2 |
| | एकुण पदे | 70 |

**वरील पदांसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत त्याचप्रमाणे अर्जदार हा खालील क्षेत्रातील नामांकित, कार्यक्षम व अनुभवी असावा.**

१. बाल न्याय मंडळ सदस्यांचे वय अर्जाच्या दिनांकास ३५ वर्षापेक्षा कमी नसावे.

२. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०२० अधिसुचना दि.२८.१२.२०२० अन्वये बालकासंबंधीत शिक्षण,आरोग्य व कल्याण कार्याच्या क्षेत्रामधील काम करण्याचा किमान सात वर्षाचा अनुभव असेल अथवा बाल मानसशास्त्र, मनोविकृतीचिकित्सा, समाजशास्त्र किंवा विधी यामधील पदवीसह व्यावसायिक कार्य करीत असावेत.

३. बाल न्याय मंडळाच्या कामकाजाशी हितसंबंध असणारी किंवा स्वतःची बालकांची काळजी घेणारी संस्था इ. असणा-या व्यक्तीची मंडळावर समाजसेवक सदस्य म्हणूण नियुक्ती केली जाणार नाही.

४. नियुक्ती कालावधी हा प्रधान दंडाधिका-याखेरीज मंडळाचे इतर दोन सदस्य, दोन कमाल सत्रांपर्यतच्या, जे सलग नसतील, नियुक्ती करीता पात्र असतील.

५. सदरची नियुक्ती हि नियुक्तीच्या दिनांकापासुन तीन वर्षाच्या कालावधीकरीता असेल.

**अटी व शर्ती**

- वरील मुददा क्रमांक १ व २ मध्ये नमूद केले नुसार वय, शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक आहे.
- बाल न्याय अधिनियम (मुलांची काळजी व संरक्षण), २०१५ मधील कलम ४(४) अन्वये खालील नमुद व्यक्ती बाल न्याय मंडळ सदस्य म्हणुन निवडीसाठी पात्र नसेल.
- मानवी हक्क किंवा बाल हक्काचे उल्लंघन केलेले नसावे, तसेच मानवी हक्क किंवा बाल हक्क याबाबत भुतकाळातीलही नोंदी नसाव्यात.
- नैतिक अधःपतनाचा आरोप नसावा व नैतिक अधःपतनाचा समावेश असलेल्या एखादया अपराधा बददल दोषी ठरवले गेले आहे आणि अशा प्रकारचे निर्दोषत्व परत करण्यात आले नाही किंवा सदर अपराधाबददल पुर्ण माफी दिली गेली नाही.
- केंद्र शासन, राज्य शासन व त्यांचे उपक्रम, निमसरकारी संस्था किंवा महामंडळ या सेवेतुन निलंबित अथवा काढून टाकलेला नसावा.
- बालकांचे शोषण, बाल मजुरी किंवा इतर कोणत्याही मानवी हक्काचे उल्लंघन किंवा अनैतिक कृत्यात कधीही सहभागी नसावा.
- तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय( मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०१८नियम ९१ (६)अन्वये निवड समितीने निवडलेला सदस्य हा

  अ) अर्जदार हा बाल न्याय मंडळाच्या कामकाजाकरीता आवश्यक वेळ व पुरेसे लक्ष देवू शकणार नाही असे एखादे पुर्णवेळ पद धारण करणारा नसावा.

  ब) बाल न्याय मंडळाचा सदस्य हा त्याच्या नियुक्त कालावधीमध्ये कोणत्याही काळजी घेणा-या संस्था (Child Care Institution) यांच्याशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जोडलेला नसावा किंवा अशा संस्थेशी त्याचा अन्य प्रकारे हितसंबंध असता कामा नये.

  क) सदस्य हा नियुक्ती कालावधीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात कोणतेही पद धारण करणारा नसावा.

  ड) सदस्य हा दिवाळखोर नसावा.

- तसेच नियम ९१ (१७) मध्ये नमुद केले प्रमाणे संबंधित अर्जदार यांचेवर फौजदारी प्रकरणाची नोंद नसावी तसेच सदर व्यक्ती चोवीस तासांहून अधिक काळ पोलीस अभिरक्षेत नसावा.
- महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण), नियम २०१८ मधील नियम ९१ (५) नुसार निवड प्रक्रिये पुर्वी सर्व अर्जदारांनी पोलीस विभागाकडुन प्राप्त केलेले चारित्रप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- अर्जदाराने विहित नमुन्यातील हमीपत्रे व संमतीपत्र देणे बंधनकारक राहिल,
- अर्जदार हा त्याच जिल्हयाचा रहिवासी असावा.

वर नमूद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटींची पुर्तता करणा-या इच्छूक व्यक्तिींनी खालील विहित नमुन्यातील अर्ज, वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम आवश्यक कागदपत्रांसह जाहिरात प्रसिध्द आलेपासून १५ दिवसांच्या आत आपले जिल्हयातील संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावेत. तसेच सदरची जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in व आयुक्तालयाच्या http://wcdcommpune.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**नयना अर्जुन गुंडे** (भा.प्र.से.)
**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्यातील जिल्हयांसाठी बाल न्याय मंडळ सदस्य या पदावर नियुक्ती करणेबाबत इच्छुक नामनिर्देशन करण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज.**

**प्रति,**

**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,**

**जिल्हा----**

1. अर्जदाराचे नाव
2. अर्जदाराची जन्मतारीख (वय)
3. अर्जदाराचा पत्ता, दुरध्वनी / मोबाईल नंबर ई-मेल आयडी.
4. अर्जदाराची शैक्षणिक अर्हत

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | वर्ष | विद्यापीठाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

5. अर्जदारास शिक्षण, आरोग्य व कल्याणकार्याच्या क्षेत्रातील बालकांसोबत काम करण्याचा किमान सात वर्षाचा अनुभव अहवाल अथवा बाल मानसशास्त्र, मनोविकृती चिकित्सा, समाजशास्त्र किंवा विधी यामधील पदवीसह व्यावसायीक कार्य करीत असलेचा अहवाल.

| अ.क्र. | अनुभवः शिक्षण, आरोग्य व कल्याणकारी क्षेत्रातील (बालकांशी निगडित कार्याचा कालावधी) | कार्यालयाचे नाव | यंत्रणेचे नाव | पदाचे नाव | थोडक्यात कार्य |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

६. अर्जदाराचा नोकरी / व्यवसायाबाबत तपशील कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक

७. अर्जदारास बाल विकास क्षेत्रातील अनुभव आहे का? असल्यास तपशिल.

८. अर्जदार व्यक्तीचे बाल न्याय मंडळावर काम करण्यासाठीचे हमीपत्र व संमतीपत्र.

९. अर्जदाराची इतर कोणत्याही समितीवर नियुक्ती झालो आहे काय? असल्यास त्याबाबतचा तपशील.

10. सोबतचे प्रतिज्ञापत्र

आपला/आपली विश्वासू
(स्वाक्षरी संपूर्ण नाव व पत्ता)

## अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र

मी श्री / श्रीमती ------------------------------------------------असे लिहून देते / देतो की, बाल न्याय मंडळ जिल्हा ------- येथील सदस्य पदासाठी अर्ज करित असून सदर पदासाठी लागू असलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. त्यानुसार

1. मी वयाची अट पुर्ण करत आहे/नाही
2. मी शिक्षणाची अट पुर्ण करत आहे/नाही
3. मी अनुभव धारण करत आहे /नाही
4. मी पुर्णवेळ काम करण्यास तयार आहे/नाही
5. माझी बाल न्याय मंडळाच्या कामकाजाशी हि तसंबंध असणारी किंवा स्वत:ची बालकांची काळजी घेणारी संस्था आहे/ नाही
6. मी मानवी हक्क किंवा बाल हक्काचे उल्लंघन केलेले नाही तसेच मानवी हक्क किंवा बाल हक्क याबाबत भुतकाळातीलही नोंदी आहेत/नाहीत
7. माझेवर नैतिक अध:पतनाचा आरोप आहे /नाही व नैतिक अध:पतनाचा समावेश असलेल्या एखादया अपराधा बददल मला दोषी ठरवले गेले आहे/नाही आणि अशा प्रकारचे निर्दोषत्व परत करण्यात आले आहे /नाही किंवा सदर अपराधाबददल पुर्ण माफी दिली गेली आहे/नाही
8. केंद्र शासन, राज्य शासन व त्यांचे उपक्रम, निमसरकारी संस्था किंवा महामंडळ या सेवेतुन मला निलंबित अथवा काढून टाकलेले आहे/नाही
9. माझा बालकांचे शोषण, बाल मजुरी किंवा इतर कोणत्याही मानवी हक्काचे उल्लंघन किंवा अनैतिक कृत्यात कधीही सहभाग आहे/नाही
10. मी नियुक्ती कालावधीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात कोणतेही पद धारण करणार आहे/नाही
11. मला कोणत्याही न्यायालयाने दिवाळखोर घोषित केले आहे/ नाही
12. माझेवर फौजदारी प्रकरणाची नोंद आहे/ नाही तसेच मला चोवीस तासांहून अधिक काळ पोलीस अभिरक्षेत ठेवलेले आहे/नाही

उपरोक्त प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेली माहिती ही माझे माहिती व समजुती प्रमाणे खरी व बरोबर असुन त्यामध्ये कोणतीही माहि ती चुकीची अढळुन आल्यास मी फौजदारी प्रक्रियेस व शिक्षेस पात्र राहिल याची मला संपुर्ण जाणीव आहे सदर प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेल्या मजकुराचे सत्यते करि ता आज रोजी मी माझी स्वाक्षरी केली असे.

स्थळ -

दिनांक -

प्रतिज्ञापत्र करणा-याचे नाव व स्वाक्षरी